महाराष्ट्र टाइम्स
दिनांक : २२/०८/२०१०
FRONT PAGE - 2

# कल्याण-डोंबिवलीत अपंग भवन




**म. टा. वृत्तसेवा,** कल्याण

अपंगत्व हे व्यंग नसून तो एक अपघात आहे. अपंगत्वावर मात करत त्यांना स्वयंपूर्ण करण्यासाठी त्यांना आर्थिक दृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी कल्याण शहरात अपंग भवन उभारण्याची घोषणा कल्याण डोंबिवली महापालिकेच्या महापौर कल्याणी पाटील यांनी केली. तसेच, अपंग बांधवांचे १,१०० स्टॉल्सचे प्रस्ताव प्रलंबित असून रस्त्याच्या कडेला स्टॉल्स देण्यापेक्षा त्यासाठी स्वतंत्र भवन भवन उभारण्याचे आश्वासनही पाटील यांनी दिले.

अपंगाचे दुसरे राज्यस्तरीय साहित्य संमेलन कल्याणच्या अत्रे रंगमंदिरात सुरु झाले असून दोन दिवस चालणाऱ्या या साहित्य संमेलनाचे उद्घाटन सामाजिक न्याय विकास राज्यमंत्री संजय सावकारे यांच्या हस्ते झाले. यावेळी नगरविकास सचिव आर. डी. शिंदे, पालिका आयुक्त रामनाथ सोनवणे, राज्य अपंग वित्त व विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक सुहास काळे यांच्यासह पालिकेतील पदाधिकारी आणि अधिकारी उपस्थित होते. राज्यभरातून या संमेलनाला सुमारे अडीच हजार अपंग बांधव उपस्थित होते.

दुर्गाडी पासून अत्रे रंगमंदिरा पर्यंत ग्रंथदिंडी काढण्या आली होती. यानंतर रंगलेल्या कार्यक्रमात अपंग बांधवांनी आपल्यातील कलागुण सादर करत उपस्थीतांची दाद मिळविली. यात गीतगायन, कथाकथन, नृत्य, काव्यसंमेलन, परिसंवाद, भित्तीचित्रण आणि अपंग बांधवांनी बनविलेल्या विविध वस्तूंचे प्रदर्शन स्टॉल्सच्या माध्यमातून मांडण्यात आले होते.



## स्कॉलरशीप तिप्पट

राज्य सरकारने अपंग विद्यार्थ्यांच्या स्कॉलरशिपमध्ये तिप्पट वाढ करण्याचा महत्त्वाकांक्षी निर्णय घेतल्याचे जाहीर केले. नव्याने जन्माला येणाऱ्या मुलांमध्ये अपंगत्व येऊ नये यासाठी मातांना किंवा तरुण मुलींना रुबेला प्रतिबंधात्मक लस देणे आवश्यक असते. आरोग्य केंद्रात ५६ रुपयांना ही लस उपलब्ध असून पालिका शाळेतील विद्यार्थीनींसाठी हे लसिकरण शिबीर राबविण्याची सूचना सावकारे यांनी केली.

शुक्रवार दि. २२ ऑगस्ट २०१४

दैनिक

# जनप्रवास

मुंबई, ठाणे, पालघर, पुणे, सांगली, सोलापूर येथून एकाचवेळी प्रसिध्द

अंक : २० पाने ८ janpravasthane@rediffmail.com / janpravas@gmail.com

### राज्यमंत्री संजय सावकारे यांचे प्रतिपादन

## अपंगांना सहानुभूतीची नव्हे, मदतीची गरज

**कल्याण/प्रतिनिधी**

राज्यातील अपंग विद्यार्थ्यांच्या स्कॉलरशिपमध्ये तीन पटीने वाढ करण्याचा महत्त्वाकांक्षी निर्णय राज्यशासनाने घेतला असल्याची घोषणा सामाजिक न्याय विकास राज्यमंत्री संजय सावकारे यांनी कल्याणात केली. कल्याणातील अत्रे रंग मंदिरात संपन्न झालेल्या अपंगांचा दुसऱ्या राज्यस्तरीय साहित्य व कला संमेलनात ते बोलत होते.



महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ आणि कल्याण डोंबिवली महानगरपालिका तसेच राष्ट्रीय अपंग विकास महासंघ, अपंग कल्याण आयुक्तालय यांनी संयुक्तरित्या या संमेलनाचे आयोजन केले होते. या दोन दिवसीय संमेलनात अडीच हजार अपंग बांधवांनी उपस्थिती दर्शविली होती. राज्य मंत्री सावकारे यांनी आपल्या भाषणात राज्य शासन करीत असलेल्या विकास कामांचा आढावा घेतला. अपंग व्यक्तींना उपचार करून त्यांचे अपंगत्व दूर करण्याचा प्रयत्न होणे आवश्यक आहेच परंतु नव्याने जन्माला येणाऱ्या मुलांमध्ये अपंगत्व येऊ नये यासाठी लसीकरणासारखे उपाय होणे आवश्यक आहेत. यावेळी शासनाचे सचिव आर. डी. शिंदे मनपा आयुक्त रामनाथ सोनावणे, महापौर कल्याणी पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. या संमेलनात भरारी २०१४ या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. मनपा क्षेत्रात अपंगांसाठी प्रशस्त भवन उभारण्याचे आश्वासन यावेळी महापौर पाटील यांनी दिले.

शुक्रवार, २२ ऑगस्ट २०१४ www.prahaar.in

प्रहार

ार/२००५/१८६८१ ■ मुंबई शब्दांना सत्याची धार ■ वर्ष १० ■ अंक ३१४

# अपंग विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत तिपटीने वाढ

## कल्याणमध्ये अपंगांच्या राज्यस्तरीय संमेलनात राज्यमंत्री संजय सावकारे यांची माहिती

▶ कल्याण *(प्रतिनिधी)*

राज्यातील अपंग विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती तिपटीने वाढवण्याचा निर्णय बुधवारी कॅबिनेटच्या बैठकीत घेण्यात आल्याचे सामाजिक न्याय राज्यमंत्री संजय सावकरे यांनी सांगितले. कल्याणमध्ये आयोजित राज्यस्तरीय अपंग कला व साहित्य संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

राज्य अपंग वित्त, विकास महामंडळ व कल्याण डोंबिवली पालिकेच्या संयुक्त विद्यमाने अत्रे रंगमंदिरात संमेलनाचे उद्घाटन राज्यमंत्री सावकरे यांच्या हस्ते पार पडले. अपंग वित्त व विकास महामंडळाकडून अपंगांना कर्ज पुरवठा करण्यात येतो. मात्र, त्यांच्याकडून परतफेडीचे प्रमाण हे ८० टक्के आहे. इतर महामंडळाकडून कर्ज पुरवठा परतफेडीचे प्रमाण ८ ते १३ टक्के आहे. त्यामुळे अपंग हे कर्जबुडवे नाहीत, असे सांगून राज्यमंत्र्यांनी त्यांचे कौतुक केले. अपंगत्व हे जन्मजात वंशतः आणि अपघाताने येते. जन्मजात अपंगांवर वैद्यकीय दृष्ट्या प्रयत्न सुरू असून त्याला यश मिळत आहे. मात्र, अपघाताने येणारे अपंगत्व हे व्यसनाच्या आधीन गेल्याचे दिसून येते. व्यसनापासून दूर रहा, असे आवाहनही त्यांनी केले.

स्थानिक स्वराज्य संस्थांनी अपंगांच्या विकासासाठी पालिकेच्या एकूण अर्थसंकल्पापैकी तीन टक्के निधी राखून ठेवणे गरजेचे आहे. मात्र, अनेक ठिकाणी या निधीचा वापर होत नसल्याची खंत राज्यमंत्र्यांनी व्यक्त करताना केडीएमसीने हा निधी चांगल्या प्रकारे वापर केल्याबद्दल त्यांचे कौतुक केले. अपंगांनी तयार केलेल्या वस्तूंचे प्रदर्शन लावण्यात आले होते. तोच धागा पकडून राज्यमंत्री सावकारे यांनी पालिकेने एखादा भूखंड अपंगांच्या बाजारपेठेसाठी उपलब्ध करून दिल्यास त्यांनी साकारलेल्या गृहपयोगी वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध होईल. त्यासाठी सरकारकडून मदतीचे आश्वासन त्यांनी दिले.

याप्रसंगी आंतरराष्ट्रीय कीर्तीचे व्हायोलीन वादक प्रभाकर धाकडे, महामंडळाचे प्रमुख सुहास काळे, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव आर. डी. शिंदे, महापौर कल्याणी पाटील, आयुक्त रामनाथ सोनावणे, अपंग संघटनेचे अशोक भोईर, विरोधी पक्षनेते विश्वनाथ राणे, स्थायी समिती सभापती दीपेश म्हात्रे, सभागृहनेता कैलास शिंदे, गटनेता रवींद्र पाटील यांच्यासह अनेक पदाधिकारी व नगरसेवक उपस्थित होते.



सामाजिक न्याय राज्यमंत्री संजय सावकरे यांच्या हस्ते राज्यस्तरीय अपंग कला व साहित्य संमेलनाचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी व्यासपीठावर महापालिका आयुक्त रामनाथ सोनावणे, स्थायी समिती सभापती दीपेश म्हात्रे, विरोधी पक्षनेते विश्वनाथ राणे आदी मान्यवर उपस्थित होते.

लोकमत

हॅलो नागपूर

नागपूर, सोमवार, दि. २८ जुलै २०१४

# अपंगांचे साहित्य संमेलन कल्याणमध्ये

## अपंगांच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण आयोजन : २१ ला उद्घाटन

नागपूर : अपंगांच्या सुप्तगुणांना वाव देण्यासाठी, जगण्याची उमेद निर्माण करण्यासाठी व त्यांचा विकास व्हावा म्हणून महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ अपंगांचे राज्यस्तरीय साहित्य व कला संमेलन आयोजित करते. गेल्या वर्षी अपंगांचे पहिले संमेलन नागपुरात पार पडले होते. यंदाचे संमेलनाचे दुसरे वर्ष आहे. हे संमेलन कल्याण महानगरपालिकेच्या पुढाकाराने आचार्य अत्रे सभागृह, शंकरराव चौक, कल्याण पश्चिम येथे २१ व २२ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आले आहे.

संमेलनाच्या उद्घाटनाला सामाजिक न्यायमंत्री शिवाजीराव मोघे, राज्यमंत्री संजय सावकारे, महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक सुहास काळे, कल्याण महापालिकेचे आयुक्त रामनाथ सोनवणे यांच्यासह सिनेसृष्टीतील कलावंत उपस्थित राहणार आहेत.

यावेळी 'भरारी-२०१४' या स्मरणिकेचे प्रकाशन होणार आहे. संमेलनाच्या उद्घाटनापूर्वी ग्रंथदिंडी निघणार आहे. संमेलनात परिसंवाद, कथाकथन, गीत, संगीत, नृत्य याचबरोबर अपंगांच्या जीवनातील अनुभव कथन, अपंगांनी तयार केलेल्या वस्तूंचे प्रदर्शन, अपंगांना स्वावलंबी जीवन जगता यावे, यासाठी तज्ज्ञांकडून मार्गदर्शन होणार आहे. यशस्वी अपंग व्यावसायिक व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या अपंगांचा सत्कार करण्यात येणार आहे. या संमेलनासाठी नागपुरातून एक रेल्वेची विशेष बोगी आरक्षित करण्यात येणार आहे. गेल्या वर्षी नागपुरात झालेल्या संमेलनाला चांगला प्रतिसाद मिळाला होता.

सरकारनेही या उपक्रमाचे कौतुक केले होते. सरकारच्या [illegible] पाठिंब्यामुळे सलग दुसऱ्या वर्षीही हे संमेलन आयोजित करण्यात यश आले असल्याचे महामंडळाचे [illegible] व्यवस्थापक गजानन वाघ यांनी सांगितले. (प्रतिनिधी)

### अपंगांना अधिकाराची जाणीव

या संमेलनामुळे अपंग कलावंतांना राज्यस्तरावर स्वतंत्र व्यासपीठ मिळाले आहे. त्यांच्यातील सुप्तगुण समाजापर्यंत प्रदर्शित झाले आहे. राज्यभरातील अपंगांशी यानिमित्त संवाद साधण्याची संधी मिळाली. त्यांच्या अधिकाराची जाणीव व सोयीसुविधांची संमेलनात माहिती मिळाली. संमेलनाचे व्यासपीठ अपंगांना संघटित होण्यासाठी उपयुक्त ठरले आहे. हा उपक्रम निरंतर सुरु राहावा, अशी अपंगांची इच्छा आहे.

वर्षा तेलंग,
अपंग कलावंत

■ शुक्रवार, २२ ऑगस्ट २०१४

पुण्य नगरी

www.epunyanagari.com facebook.com/punyanagari1

Thane-Kalyan

वली, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर, मुरबाड, शहापूर, भिवंडी

# अपंगांना सहानुभूती नको सहकार्य हवे



सामाजिक न्याय राज्यमंत्री संजय सावकारे यांचे प्रतिपादन

**कल्याण :** परमेश्वराने अन्याय करूनही काही अपंगांनी स्वतःमधील अपंगत्वावर मात करून यशाची शिखरे गाठली, ध्येय साध्य केले. शासन त्यांना आर्थिक मदत करतेच आहे. त्या शिवाय अनेक सामाजिक संस्थांही त्यांच्या मदतीसाठी काम करीत आहेत. मात्र अपंगांना सहानुभूती नको तर सहकार्य हवे आहे. सर्वसाधारण माणसांपेक्षा आपणही चांगले जीवन जगू शकतो, यांची प्रेरणा साहित्य कला संमेलनातून अपंगांना मिळेल, असे प्रतिपादन रायाचे सामाजिक न्याय राज्यमंत्री संजय सावकारे यांनी केले. कल्याणमध्ये आयोजित करण्यात आलेल्या दुसऱ्या राज्यस्तरीय अपंग कला साहित्य संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ व कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दुसऱ्या राज्यस्तरीय अपंग साहित्य व कला संमेलनास मोठ्या उत्सवी वातावरणात गुरुवारी झाली. सकाळी दुर्गाडी येथून भव्य ग्रंथदिंडी काढण्यात आली. या वेळी पालखीत अपंगाचे साहित्य, कलाकृती ठेवण्यात आल्या होत्या. दिंडीत ढोल-ताशे, लेझीम पथकासह राज्याच्या विविध भागातून आलेले अपंग कलावंत मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. याप्रसंगी सामाजिक न्याय विभागाचे सचिव आर.डी. शिंदे, महापौर कल्याणी पाटील, आयुक्त रामनाथ सोनवणे, सभागृह नेते कैलास शिंदे, स्थायी समिती सभापती दीपेश म्हात्रे, विरोधी पक्षनेते विश्वनाथ राणे, गटनेते रवींद्र पाटील, श्रीकर चौधरी, सचिन पोटे, संजय पाटील, नगरसेवक गणेश जाधव, अपंग वित्त व विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक सुहास काळे आदी मान्यवर उपस्थित होते. या वेळी संजय सावकारे म्हणाले, राज्य शासनाच्या इतर महामंडळांपेक्षा अपंग महामंडळाची वसुली सर्वाधिक म्हणजे ८५ टक्के इतकी जास्त आहे. अपंगांनी स्वतः कर्ज घेऊन इतरांनाही रोजगाराला लावले. अपंगत्व विविध कारणांनी येते, मात्र ते येऊ नये यासाठी काळजी घेणे आपल्या हातात आहे. त्यासाठी देण्यात येणारी लस महापालिकांच्या शाळांमध्ये देण्यात यावी. तसेच मुलांना जन्मतः येणारे बहिरत्व टाळण्यासाठीचे यंत्र पालिकेने सर्व आरोग्य केंद्रांमध्ये उपलब्ध करून द्यावे, अशी सूचना त्यांनी केली. महापालिकेने अपंगांसाठी भूखंड आरक्षित केल्यास त्या ठिकाणी महामंडळातर्फे मार्केट उभारण्यासाठी निधी उपलब्ध करून देऊ. या मार्केटमध्ये अपंगांनी तयार केलेल्या साहित्याची विक्री व प्रदर्शन करता येईल, असेही ते या वेळी म्हणाले. महापौर कल्याणी पाटील यांनी अपंगांना रोजगार उपलब्ध करण्यासाठी स्वतंत्र भवन उभारण्याची घोषणा केली. अपंग महामंडळाने राज्यपातळीवर मर्यादित न राहता देशपातळीवर संमेलन घ्यावे त्याचे यजमानपदही महापालिका घेईल, अशी ग्वाही दिली.

लोकमत
# हॅलो ठाणे
मुंबई, शुक्रवार, दि. २२ ऑगस्ट २०१४

**अपंगत्व आले तरी मनाने खचू नका**

अपंगत्व आले तरी मनाने खचू नका. त्यावर मात करण्यासाठीच अशा साहित्य संमेलनाची गरज आहे.

पान ३



## अपंगांच्या साहित्य संमेलनाचे उद्घाटन : शैक्षणिक शिष्यवृत्तीमध्ये तीन पटींनी वाढ

# अपंगत्व आले तरी मनाने खचू नका - संजय सावकारे

विनायक बेटावदकर • कल्याण

अपंगत्व आले तरी मनाने खचू नका. त्यावर मात करण्यासाठीच अशा साहित्य संमेलनाची गरज आहे. अपंगांच्या शैक्षणिक शिष्यवृत्तीमध्ये तीन पटींनी वाढ करण्यात आली आहे. वित्त सहाय्य मंडळाकडून अपंगांना व्यवसायासाठी अर्थ सहाय्य केले जाते. अनेकांनी त्याचा लाभ घेतला आहे. इतरांनीही त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन सामाजिक न्याय, स्वयंरोजगार विभागाचे राज्यमंत्री संजय सावकारे यांनी केले.

महाराष्ट्र राज्य अपंग विज्ञान विकास महामंडळ, कल्याण-डोंबिवली महापालिका, राष्ट्रीय अपंग विकास महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या अपंगांच्या साहित्य व कला संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

व्यसनांमुळे झालेल्या अपघातातून निर्व्यसनी व्यक्तींनाही अपंगत्व येते. त्यामुळे अपंगत्व येणारच नाही, यासाठी प्रयत्न झाले पाहिजे असेही ते म्हणाले.

साहित्य, कला, संस्कृती क्षेत्रात विकलांग व्यक्ती कोणत्याही दृष्टीने मागे नाही. उलट त्यांचे साहित्य अधिक दर्जेदार, भावपूर्ण आणि हृदयस्पर्शी असते असे प्रतिपादन कल्याण-डोंबिवली महापालिकेचे आयुक्त रामनाथ सोनावणे यांनी केले. स्वानुभवातून या साहित्याची निर्मिती झाली असल्याने समाजाचे खरे प्रतिबिंब त्यात दिसते, असेही सोनावणे म्हणाले.

आंतरराष्ट्रीय ख्यातीचे व्हायोलीन वादक व संगीतकार प्रभाकर धाकडे यांच्या अध्यक्षतेखाली सुरु झालेल्या या संमेलनात महाराष्ट्रातून दीड हजारांच्यावर प्रतिनिधी उपस्थित होते. कल्याण-डोंबिवलीच्या महापौर कल्याणी पाटील या समंलनाच्या स्वागताध्यक्ष आहेत. सामाजिक न्याय विभागाचे सचिव आर.डी. शिंदे, अपंग विकास मंडळाचे व्यवस्थापकीय संचालक सुहास काळे, संचालक सदस्य अशोक भोईर आदी यावेळी उपस्थित होते.

आचार्य अत्रे नाट्यगृहातील या सम्मेलनातील व्यासपीठाला संत सूरदास व्यासपीठ असे नाव देण्यात आले आहे. सावकारे यांच्या हस्ते भरारी या स्मरणिकेचेही प्रकाशन करण्यात आले.

आनंद मोरे



'भरारी' या स्मरणिकेचे या वेळी सावकारे यांच्या हस्ते प्रकाशन झाले. त्या वेळी उपस्थित मान्यवर.

- अपंगांच्या बाबतीत कल्याण-डोंबिवली महापालिकेने प्रथम पासूनच मानवतावादी दृष्टीकोन ठेवला आहे. महापालिकेत ७१ अपंगांना विविध पदांवरील सेवेत सामावून घेण्यात आले. अजूनही ११00 लोकांचे अर्ज प्रलंबित आहेत. खासगी जागेत अपंगाची सोय करण्यात मालकांकडून अडचणी येतात. अपंगांना वैद्यकीय सेवा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने विशेष आरोग्य केंद्र सुरु होणार आहे.
- सकाळी अपंगांच्या ग्रंथदिंडीने संमेलनाच्या कार्यक्रमाला प्रारंभ झाला. दुपारच्या सत्रात अभिनेत्री अलका कुबल, प्रभाकर धाकडे यांची मुलाखत व सायंकाळच्या सत्रात प्रभाकर धाकडे यांचे व्हायोलीन वादन, संगीत संध्या कार्यक्रमांना उपस्थितांचा प्रतिसाद मिळाला.

### एका दिवसात बांधला जिना

अपंगाच्या साहित्य व कला संमेलनाचे राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार उद्घाटन करणार असल्याचे जाहीर करण्यात आले होते. शिवाय विधान परिषदेचे उपसभापती वसंत डावखरे, उत्पादन शुल्कमंत्री गणेश नाईक, वैद्यकीय शिक्षण मंत्री जितेंद्र आव्हाड, सिडकोचे अध्यक्ष प्रमोद हिंदुराव उपस्थित राहणार असल्याचे जाहीर केले होते. पण यापैकी कोणीही कार्यक्रमाला नव्हते. अपंगांच्या साहित्य कला संमेलनासाठी कल्याण-डोंबिवली महापालिकेने नाट्यगृहात वरच्या मजल्यावर जाता यावे म्हणून एक दिवसात सिमेंटचा उतरता जिना बांधला.

ठाणे सकाळ TODAY

दि. 23/8/2014



**कल्याण** : अत्रे रंगमंदिरात दुसरे राज्यस्तरीय अपंग साहित्य व कला संमेलन सुरू आहे. या संमेलनाच्या निमित्ताने राष्ट्रीय अपंग विकास महासंघाने 'सर्व जल अभियाना'ला पाठिंबा देऊन पाणी वाचवण्याची शपथ घेतली. यावेळी महासंघाचे अध्यक्ष शहाजी कोळी, कार्यवाह संजय जगताप, पदाधिकारी वंदना ताजणे, अजय ताजणे, रवींद्र गायकवाड, गणेश वायकर, राजेंद्र रोतरे, चेतन जाधव, फारुक नांदगावकर, दीपक बेनरे उपस्थित होते.